दैनिक

मनोरंजनासह प्रबोधनासाठी... epaper.rayatsamachar.com

# रयत समाचार

खिचों न कमानों को, न तलवार निकालो, जब तोप मुकाबिल हो, तो अख़बार निकालो - अकबर इलाहाबादी

संपादक : भैरवनाथ वाकळे | महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक राज्यात एकाचवेळी प्रसिध्द होणारे दैनिक

• RNI No. MAHMAR/2011/40847 • वर्ष १३ वे • अंक ४१३ वा • गुरुवार, ता. २५ सप्टेंबर २०२५ • www.rayatsamachar.com • पाने ४ • मूल्य रु. ४.००

## अंशतः अनुदानित शिक्षकांनाही मिळणार वैद्यकीय प्रतिपूर्ती



**मुंबई । रयत समाचार** राज्यातील १०० टक्के अनुदानित शाळेतील शिक्षकांना शासनामार्फत मिळणाऱ्या वैद्यकीय प्रतिपूर्तीच्या लाभाचा विस्तार आता अंशतः अनुदानित शाळांपर्यंत होणार आहे. सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी यासंदर्भातील महत्त्वपूर्ण घोषणा केली. आरोग्यभवन येथे आबिटकर यांच्या अध्यक्षतेखाली विविध शिक्षक संघटनांसोबत झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. यानुसार २० टक्के ते ८० टक्के अनुदानित शाळेतील सर्व शिक्षकांना वैद्यकीय प्रतिपूर्तीचा लाभ मिळावा यासाठी आरोग्य सेवा आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात येणार आहे. या बैठकीला माजी आमदार कपिल पाटील, आरोग्य सचिव डॉ. निपुण विनायक, आरोग्य सेवा आयुक्त डॉ. कादंबरी बलकवडे, महात्मा फुले जन आरोग्य योजनेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अण्णासाहेब चव्हाण, उपमुख्यमंत्री वैद्यकीय सहायता कक्ष प्रमुख मंगेश चिवटे तसेच विविध शिक्षक संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते. शिक्षक संघटनांनी शासनाकडे सातत्याने केलेल्या पाठपुराव्यानंतर आलेला हा निर्णय शिक्षक वर्गाला दिलासा देणारा ठरणार असून, शालेय शिक्षण व्यवस्थेतील मोठ्या प्रश्नावर सरकारकडून सकारात्मक पाऊल उचलले गेल्याचे समाधान व्यक्त होत आहे.



## लिंग गुणोत्तर सुधार पीसीपीएनडीटी कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणी

**मुंबई । रयत समाचार** राज्यातील स्त्री-पुरुष लिंग गुणोत्तर वाढविण्यासाठी तसेच स्त्री भ्रूणहत्या रोखण्यासाठी गर्भधारणापूर्व व प्रसूतीपूर्व निदान तंत्रे (गर्भलिंग निदान प्रतिबंध) कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करण्याचे स्पष्ट निर्देश सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिले. आबिटकर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या राज्यस्तरीय पर्यवेक्षकीय मंडळाच्या बैठकीत जिल्हानिहाय पर्यवेक्षकीय समित्या एका महिन्यात स्थापन करण्याचे ठरले. या समित्यांमार्फत नियमित कार्यशाळा घेऊन पीसीपीएनडीटी कायद्याची अंमलबजावणी अधिक काटेकोरपणे केली जाणार असल्याचे सांगण्यात आले. या बैठकीस आमदार मंजुळा गावित, आमदार सुलभा खोडके, आरोग्य सेवा आयुक्त व राष्ट्रीय आरोग्य अभियानाचे संचालक डॉ. कादंबरी बलकवडे, आरोग्य सेवा संचालक डॉ. विजय कंदेवाड, अतिरिक्त संचालक डॉ. संदीप सांगळे, विधी तज्ज्ञ, अशासकीय संघटनांच्या प्रतिनिधींसह विविध क्षेत्रातील तज्ज्ञ दूरदृश्य प्रणालीद्वारे उपस्थित होते. बैठकीत समाजशास्त्रज्ञ, स्त्रीरोग व प्रसूती तज्ज्ञ, बालरोगतज्ज्ञ, रेडिओलॉजिस्ट यांच्यासह महिला व बाल विकास विभाग व वैद्यकीय शिक्षण विभागाचे प्रतिनिधी सहभागी झाले. लिंग निवड रोखण्यासाठी सर्व स्तरावर जनजागृती करणे, वैद्यकीय तंत्रज्ञानाचा दुरुपयोग थांबवणे आणि कायद्याचे उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर कारवाई करणे, या बाबींचा ठाम पणे पुनरुच्चार करण्यात आला. मंत्री आबिटकर यांनी स्पष्ट केले की, स्त्री भ्रूणहत्येमुळे समाजातील समतोल ढासळतो. त्यामुळे प्रत्येक जिल्ह्यातून काटेकोर अंमलबजावणी करून सकारात्मक बदल घडविणे ही सर्वांची जबाबदारी आहे.

## दहिसर दसरा २०२५

### भक्तिप्रधान १८वा नवरात्रोत्सव देवीचे अलौकिक दर्शन, भव्य दीपोत्सव




**रयत समाचार । मुंबई । गुरुदत्त वाकदेकर**

मुंबईतील जीएसबी समुदाय भक्तांसाठी आणखी एक खास उत्सव घेऊन येत आहे. दहिसर येथील जीएसबी सभा आयोजित दहिसर दसरा १८वा नवरात्रोत्सव २२ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर २०२५ दरम्यान सारस्वत कल्चरल अँड रिक्रिएशन सेंटर (जी.एस.बी. गार्डन), एन.एल. कॉम्प्लेक्सजवळ, दहिसर ईस्ट, मुंबई येथे रंगणार आहे. हा उत्सव भक्तांना देवीच्या दिव्य अवतारांचे दर्शन घेऊन त्यांच्या श्रद्धा आणि भक्तिप्रधान अनुभवाचा आनंद घेण्याची अनन्यसाधारण संधी देतो. प्रत्येक दिवशी देवीचे वेगळे रूप दर्शनासाठी सजवले जाते, ज्यामुळे भक्तांना तिच्या प्रत्येक दिव्य अवताराचे पूजन करण्याची संधी मिळते. २००८ मध्ये परमपूज्य श्रीमद् सुधीन्द्र तीर्थ स्वामीजींच्या कृपाशिर्वादाने सुरू झालेला हा उत्सव आज मुंबईतील सर्वाधिक प्रतिष्ठित नवरात्रोत्सवांपैकी एक ठरला आहे. भव्य दीपोत्सव आणि 'माँ काली'ची पूजा हे उत्सवाचं मुख्य आकर्षण आहे. अष्टमीच्या दिवशी हजारो दिव्यांच्या प्रकाशाने उजळलेल्या मंडपामध्ये भक्तिभावाने पूजा केली जाते. दिव्यांच्या लुकलुकणाऱ्या प्रकाशात भक्तिगीतांचे स्वर आणि सामूहिक प्रार्थनेचे वातावरण भक्तांना मंत्रमुग्ध करते. उत्सव केवळ श्रद्धेचा नव्हे, तर सेवांचा आदर्शही ठरतो. दरवर्षी ५०,००० हून अधिक भक्तांना महाप्रसाद, पात्र विद्यार्थ्यांना १५२० लाख रुपयांच्या शिष्यवृत्तीचे वितरण, तर २,००० पेक्षा जास्त मुलांना मोफत शैक्षणिक साहित्य संच प्रदान केले जातात. समाजसेवा आणि सांस्कृतिक समृद्धी यावरही उत्सव भरपूर भर देतो. नियमित रक्तदान शिबिरे, मोफत आरोग्य तपासण्या आणि सतत चालू असलेली वैद्यकीय मदत समाजकल्याणात जीएसबी सभेची बांधिलकी अधोरेखित करतात. शास्त्रीय नृत्य, भजन-कीर्तन, वाद्यसंगीत आणि दीपोत्सवाची शोभा या सर्वांनी उत्सवाला विशेष ओळख दिली आहे. ह्या ह्या महापर्वाचे यूट्यूब आणि फेसबुक (@GSBSabhaDahisar) वर थेट प्रक्षेपण केले जाणार आहे, ज्यामुळे जगभरातील भक्तही उत्सवाचा अनुभव घेऊ शकतील. जीएसबी सभा, दहिसर-बोरिवलीचे जयेश प्रभू म्हणाले, "१८ वर्षांपासून दहिसर दसरा हा केवळ सण नव्हे, तर श्रद्धा, सेवा आणि ऐक्याची एक यात्रा आहे. या वर्षीही आम्ही आपल्या परंपरा पुढे नेण्याचे वचन पुन्हा एकदा देत आहोत, तसेच शिक्षण, आरोग्यसेवा आणि अन्नदानाद्वारे समाजाची सेवा करत आहोत. मुंबईकरांना आमच्या नवरात्र उत्सवातील दैवी अनुभव आणि सांस्कृतिक संपन्नतेत सामावून घेण्यासाठी मनःपूर्वक आमंत्रित करतो."

## सांगा धनाचा साठा अन् आमचा वाटा कुठं हाय हो

**रयत समाचार**

**राजेंद्र देवढे । विशेष प्रतिनिधी**


शेवगाव व पाथर्डी तालुक्यांसह जिल्ह्याच्या दक्षिण भागातील तालुक्यांत झालेल्या मुसळधार पावसामुळे शेतकरी संपूर्णतः तबाह झालेला असताना मायबाप सरकारने तुटपुंजी मदत जाहीर करुन शेतकऱ्यांच्या भळभळत्या जखमेवर मीठ चोळले आहे. एकीकडे मूठभर उद्योगपतींना लाखो कोटी रुपयांची कर्जमाफी करणाऱ्या केंद्र सरकारच्या या धाकट्या भावाने महाराष्ट्रातील ३१ लाख ६४ हजार शेतकऱ्यांना २, २१५ कोटी रुपयांची आर्थिक मदत मंजूर केली आहे. यापैकी १८२९ कोटी रुपये जिल्हास्तरावर वितरीत केले आहेत. केंद्र सरकारकडे मदतीचा प्रस्ताव पाठवणार असून तोवर राज्याने तातडीने मदतीचे वाटप सुरू केल्याचंही सांगण्यात आलं आहे. तसेच प्रचलित निकषांमध्ये शिथिलता आणून शेतकऱ्यांना मदत केली जाणार असल्याची घोषणा, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली आहे.

राजा उदार झाला अन् हाती भोपळा दिला, अशा आशयाची मराठीत एक म्हण आहे. ज्याला काहीही किंमत नाहीं अशी वस्तु मोठ्या औदार्याचा आव आणून देणे. असा या म्हणीचा अर्थ आहे. पूर्वी एकदा कर्जमाफी देतानाही अंशतः व तत्वतः अशी मुक्ताफळं फडणवीसांनी उधळली होती. ती पदरात पाडून घेण्यासाठी लागणारी कागदपत्रे सादर करता करता शेतकऱ्यांच्या नाकी नऊ आले होते. आताही तसलंच औदार्य दाखवताना, केंद्र सरकारकडे मदतीचा प्रस्ताव पाठवणार असल्याचं गाजर शेतकऱ्यांना दाखवण्यात आलं आहे. ती मदत मिळेपर्यंत कदाचित स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका झालेल्या असतील. म्हणजेच, राज्यात सरकार येण्यापूर्वी जसा लाडक्या बहिणींचा प्रयोग केला होता अगदी तसाच यावेळीही करायचा आणि वेळ मारुन न्यायची-असाही हा कावा असू शकतो.

राज्य सरकारने जाहिर केलेल्या या प्रचंड मदतीतून शेतकऱ्यांच्या हातात दरडोई किती रुपये पडतील, हे सांगण्याएवढा गणितज्ञ मी नाही. परंतु, मशागतीपासून पिक हाती पडेपर्यंत एकरी किती खर्च येतो-हे मात्र छातीठोकपणे सांगू शकतो. निदान तेवढा पैसा दिला असता तरी शेतकरी सावरला असता. अक्षरशः आभाळ फाटल्यामुळे शेतकरी कफल्लक झालेला असताना स्वतःच्या बंगल्यातील फर्निचरवर लाखो रुपये खर्च करणाऱ्या मुख्यमंत्र्यांनी दरडोई एक लाख रुपये शेतकऱ्यांना दिले असते तर तहहयात तेच मुख्यमंत्री राहिले असते. अजित पवार यांनी घातलेल्या ७०००० हजार कोटींच्या दरोड्यातील, अशोक चव्हाण यांनी घातलेल्या आदर्श दरोड्यातील व अन्य नेत्यांनी घातलेल्या छोट्या-मोठ्या दरोड्यांसह स्वपक्षातील नवदरोडेखोरांच्या लुटींतला अर्धा हिस्सा वसूल करुन शेतकऱ्यांना दिला असता तरी संपूर्ण महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना लखलाभ झाला असता.



**राजेंद्र देवढे**
विशेष प्रतिनिधी
९८२२७४७३२०
**राज की बात**



देशातील राष्ट्रीयीकृत बँकांचे अब्जावधी रुपये घेऊन राजरोस पलायन करणाऱ्या उद्योजकांना जाऊ न देता इतरांचेही लाखो कोटी रुपये माफ केले नसते तर कदाचित पतप्रधानांचा १५ लाखांचा जुमलाही प्रत्यक्षात आणता आला असता. परंतु तसं होणं हे भाजपालाच नाही तर कोणत्याही पक्षांतील नेत्यांना चालणार नाही. कारण, तसं झालंच तर निवडणुकांसह अन्य कार्यक्रमांत घोषणा देण्यासाठी व हुजरेगिरी करण्यासाठी कुणालाच माणसं उपलब्ध होणार नाहीत. म्हणून देवीचंच घेऊन देवीला अर्पण करणारी ही जमात जोपर्यंत हद्दपार होणार नाही तोपर्यंत हा देश कधीही विकसीत होणार नाही. सध्या देशात असलेल्या लुटारुंचं सुदैव आणि लोकांचं दुर्दैव म्हणून अशी क्रांती घडवून आणणारा भगतसिंग या देशात अजून जन्माला आला नाही. परंतु तो येणारंच नाही असंही नाही. जोपर्यंत नष्टचर्य बदलत नाही तोपर्यंत या देशाचं भाग्यही बदलणार नाही.

अस्मानी संकटामुळे बळीराजाचं नेमकं किती नुकसान झालं, याची आकडेवारी अजून उपलब्ध झालेली नाही. कारण, प्रशासनाचं काम चालू आहे. शासन व प्रशासन या एकाच नाण्याच्या दोन बाजू असल्यामुळे, मुख्यमंत्र्यांच्या सत्पात्री दानाविषयी आताच यापेक्षा जास्त काही बोलता येणार नाही. ती यथावकाश समजल्यावर अवश्य परामर्श घेतला जाईल. तरीही राज्यकर्यांनी डोळ्यांवर कातडं ओढून चालणार नाही. कारण, त्यामुळे उद्रेकाचं मांजर थांबणार नाही. फार फार तर ते राज्यकर्त्यांना दिसणार नाही परंतु येणार मात्र नक्की... त्याच्या पावलाचा आवाज येत नसल्यामुळे राज्यकर्ते निर्धास्त असले तरी त्याने हिमालय कधीच ओलांडला आहे. जेव्हा ते येईल तेव्हा शाहीर वामनराव कर्डक यांच्या सुप्रसिद्ध गीतासारखं विचारील-

सांगा आम्हाला बिर्ला बाटा, टाटा कुठं हाय हो।
सांगा धनाचा साठा अन् आमचा वाटा कुठं हो।।




## पुतळ्याचा चौथरा महाराजांसाठी की मार्केटिंगसाठी ?



**रयत समाचार । किरण डहाळे**

अहिल्यानगर येथील प्रोफेसर कॉलनी चौकात उभारण्यात येणाऱ्या छत्रपती संभाजी महाराजांचा पुतळ्याचा चौथरा आजी- माजी- भावी नगरसेवकांसाठी आणि विविध व्यापारी महाराजांसाठी मार्केटिंगचा चौक झाला आहे. आमदार संग्राम जगताप यांच्या विशेष प्रयत्नातून पुतळ्याच्या चौथऱ्याचे काम जवळ जवळ पूर्णत्वास गेले आहे. मात्र पूर्णत्वाआधीच या चौथऱ्याच्या भिंतीवर फ्लेक्सचे अतिक्रमण सुरु झाले आहे.

नगर शहरात छत्रपती संभाजीराजांचा पूर्णाकृती पुतळा उभारण्याचा ठराव २००७ मध्ये महापालिकेने केला होता. त्यानुसार सुमारे १० लाख रुपये खर्चून १० ते १२ फूट उंचीचा ब्राँझ पुतळा तयार करण्यात आला आहे.

खरं तर नगर- कल्याण रस्त्यावरील नेप्ती चौकात हा पुतळा उभारण्याचे नियोजन होते. मात्र, नंतर नगर-कल्याण महामार्गाचे कल्याण-विशाखापट्टणम राष्ट्रीय महामार्गात रूपांतर झाल्याने व त्याची रुंदी वाढल्याने या चौकात पुतळ्यासाठी जागा उपलब्ध होत नव्हती. त्यामुळे मग हा पुतळा सावेडीच्या प्रोफेसर कॉलनी चौकात उभारणीचे प्रस्तावित करण्यात आले. सावेडी उपनगरातील प्रोफेसर कॉलनी चौकात प्रस्तावित असलेला छत्रपती संभाजीमहाराजांचा पुतळा १८.३ फूट उंच चौथऱ्यावर उभारण्यात येणार आहे. किल्ल्याच्या बुरुजाची प्रतिकृती असणाऱ्या याचौथऱ्यावर महाराजांचा १२ फूट उंचीचा पुतळा बसविण्यात येणार आहे. दरम्यान, या चौथऱ्याच्या दोन्ही बाजूंनी २७ ते ३० मीटरपर्यंत गार्डन, पाथ वे करून सुशोभीकरण करण्यात येणार आहे.

दुर्दैव असे की, प्रोफेसर कॉलनी चौकात छत्रपती संभाजी महाराज यांच्यासाठी बांधण्यात आलेल्या स्मारकाच्या भिंतींवर आजी/माजी / भावी इच्छुकांनी फ्लेक्सची घरे केली आहेत. या पुतळ्याच्या उभारणीसाठी आमदार संग्राम जगताप यांनी प्रयत्न केल्याचा फलकही तिथे लावण्यात आला आहे. तथापि, फ्लेक्स लावणारे आणि मार्केटिंग करणाऱ्या कंपन्यांना त्याची माहिती नसावी.

काही वर्षांपूर्वी काही हिंदुत्त्ववादी संघटनांनी रात्रीतुन प्रोफेसर कॉलनी चौकात छत्रपती संभाजी महाराजांचा पुतळा बसवण्याचा प्रयत्न केला होता. मात्र पोलिसांनी तो हाणून पाडला होता. मात्र सध्या या पवित्र ठिकाणाच्या होत असलेल्या दुरुपयोगाकडे या संघटनांनीदेखील डोळेझाक केल्याचे दिसून येत आहे.

शहर स्वच्छता अभियानाचा किंवा सौंदर्यीकरणाचा डंका पिटणाऱ्या महापालिका प्रशासनाचे या मार्केटिंग प्लेसकडे सोईस्कर दुर्लक्ष सुरु आहे अशी भावना परिसरातील नागरिक व्यक्त करत आहेत. पुतळा उभारण्यापूर्वीच फ्लेक्सबाजी सुरु झाल्याने पुतळा अनावरणानंतर काय अवस्था होईल? याची चर्चा नगरकरांमध्ये सुरु आहे.

## तरुणाईला वेढणारा हृदयरोग : आकाशवाणीवर २९ सप्टेंबरला तज्ज्ञांचे मार्गदर्शन

**अहमदनगरी । रयत समाचार**

जागतिक हृदय दिनानिमित्त आकाशवाणी, अहिल्यानगर केंद्राच्या वतीने ''हृदयरोग तरुण होतोय'' या राज्यस्तरीय विशेष समन्वित कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. हृदयरोगाच्या वाढत्या धोक्याबाबत जागरूकता निर्माण करणे व त्यावर प्रतिबंधात्मक उपाय सुचवणे हा या कार्यक्रमाचा हेतू आहे. कार्यक्रमाचे लेखक हृदयरोग तज्ज्ञ डॉ. धनंजय वारे असून, सादरकर्ते म्हणून सुदाम बटुळे आहेत. या विशेष चर्चेत डॉ. महेश जरे (हृदयरोग तज्ज्ञ), डॉ. अमित सपकाळ (मनसोपचार तज्ज्ञ), डॉ. विवेक पवार



(फिजिओथेरपिस्ट) आणि आहारतज्ज्ञ रिद्धी सुराणा यांचा सहभाग राहणार आहे. कार्यक्रमाचे प्रसारण सोमवारी ता. २९ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी ८.४० वाजता महाराष्ट्रातील सर्व आकाशवाणी केंद्रांवर होणार असून पुन:प्रसारण रात्री ८.१५ वाजता ऐकता येईल. आकाशवाणी अहमदनगर केंद्र १००.१ व या मोबाईल ॲपवरूनही हा कार्यक्रम जगभर ऐकता येणार आहे. आरोग्यदायी जीवनशैलीकडे वाटचाल करताना तरुणाईत वाढत्या हृदयरोगाचा धोका गंभीर ठरत असल्याने, या उपक्रमाद्वारे सर्वसामान्यांना योग्य मार्गदर्शन मिळणार आहे, असे डॉ. धनंजय वारे म्हणाले.

# अहमदनगर महाविद्यालयात जीवन विज्ञानक्षेत्रातील आंतरराष्ट्रीय परिषद

### आयसीआरडीआयएलएस२०२५

**अहमदनगर । रयत समाचार**

भास्कर पांडुरंग हिवाळे एज्युकेशन सोसायटीच्या (बीपीएचईएस) अहमदनगर कॉलेजतर्फे ता. १८१९ सप्टेंबर २०२५ रोजी ''आंतरराष्ट्रीय परिषद ऑन रिसेंट डिस्कव्हरीज अँड इनोव्हेशन्स इन लाइफ सायन्सेस(आयसीआरडीआयएलएस२०२५)'' आयोजित करण्यात आली. दोन दिवस चाललेल्या हायब्रिड परिषदेतील भारतासह परदेशातून ४५० हून अधिक प्रतिनिधी सहभागी झाले. त्यामुळे ही परिषद या भागातील सर्वांत मोठ्या आंतरराष्ट्रीय वैज्ञानिक मेळाव्यांपैकी एक ठरली. परिषदेचे उद्घाटन प्रख्यात वैज्ञानिक डॉ. भूषण पटवर्धन यांनी केले. डॉ. पटवर्धन यांनी डॉ. विजय खन्ना मेमोरियल व्याख्यान देताना औषध संशोधनातील नव्या प्रवाहांवर विचार मांडले. त्यांनी अहमदनगर कॉलेजमधील विद्यार्थी दिवसांच्या आठवणी सांगितल्या आणि तरुण संशोधकांना नवोन्मेषना नैतिकतेसह पुढे नेण्याचे आवाहन केले. परिषदेतील ३० हून अधिक आमंत्रित व्याख्यकांमध्ये डॉ. जयप्रकाश मुळीयिल, डॉ. मनोहर आर. फुर्टाडो, प्राध्यापक अरविंद ए. नाटू, डॉ. सी.के. जॉन, डॉ. शर्मिला बापट,



डॉ. सुरेंद्र घासकडबी, डॉ. राहुल भांबुरे, डॉ. सौरव मजुमदार, डॉ. एस.टी. लोंकार, डॉ. शुभांगी मुंगरे, डॉ. चित्रा एफ. मनोहर, प्राध्यापक पोरुनेलूर मॅथ्यू, डॉ. सुजीत नीरक्कल, डॉ. शंकर स्वामिनाथन, डॉ. जे.आर. कुमार, डॉ. शिवराजू यांचा समावेश होता. विविध सत्रांमध्ये रसायनशास्त्र, जीव रसायनशास्त्र, आण्विक जीवशास्त्र, जैविक तंत्रज्ञान, शेती, पर्यावरण विज्ञान, न्यूट्रास्युटिकल्स व बायोमेडिकल इनोव्हेशन्स यांचा समावेश होता. तरुण संशोधकांसाठी प्रत्यक्ष सादरीकरण व ईपोस्टर स्पर्धा आयोजित केल्या गेल्या. निवडलेल्या संशोधकांना आंतरराष्ट्रीय वैज्ञानिक नियतकालिकेत संशोधन प्रकाशित करण्याची संधी मिळाली. परिषदेच्या यशामागे डॉ. आर. जे. बार्नबस (अध्यक्ष, बीपीएचईएस) व विशाल बार्नबस (सचिव, बीपीएचईएस) यांचे नेतृत्व महत्वाचे ठरले. कन्व्हीनर डॉ. नोएल पार्जे व आयोजक सचिव डॉ. इवान अरान्हा यांनी आयोजन यशस्वीरीत्या सांभाळले. सांस्कृतिक व पुरस्कार समारंभात उत्कृष्ट संशोधन सादरीकरणांचा गौरव करण्यात आला. परिषदेला प्रेरणा डॉ. मनोहर आर. फुर्टाडो (अमेरिका) व सायन्स एज्युकेशन अँड रिसर्च इंडिया असोसिएशन ट्रस्ट कडून मिळाली. आयसीआरडीआयएलएस२०२५ ही परिषद वैज्ञानिक उत्कृष्टतेचा उत्सव ठरली आणि अहमदनगर कॉलेजचे जागतिक शैक्षणिक देवाणघेवाण व नाविन्याचे केंद्र म्हणून स्थान अधिक बळकट केले.

## प्रियंका आठरे यांच्या हस्ते कर्तृत्ववान महिलांचा गौरव

### रविवारी नवदुर्गा सन्मान सोहळा

**अहमदनगर । रयत समाचार**

निमगाव वाघा (ता. नगर) स्व. पै. किसनराव डोंगरे बहुद्देशीय संस्था, श्री नवनाथ युवा मंडळ, धर्मवीर ग्रामीण सार्वजनिक वाचनालय आणि नगर तालुका तालिम सेवा संघ यांच्या संयुक्त विद्यमाने निमगाव वाघा येथे नवरात्र उत्सवाच्या सातव्या माळेनिमित्त रविवारी (दि. २८ सप्टेंबर) नवदुर्गा सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला आहे. या सोहळ्यात विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या कर्तृत्ववान महिलांचा गौरव भरोसा सेलच्या प्रभारी अधिकारी पोलीस उपनिरीक्षक प्रियंका आठरे यांच्या हस्ते केला जाणार आहे. निमगाव वाघा येथील परिवार मंगल



कार्यालयात सकाळी ११ वाजता महिलांचा सन्मान सोहळा होणार असून, त्याच वेळी महिला मेळाव्याचे आयोजनही करण्यात आले आहे. समाजातील विविध क्षेत्रातील महिला मोठ्या संख्येने या कार्यक्रमात सहभागी होणार आहेत. सामाजिक, साहित्य, आरोग्य, शैक्षणिक, कला, क्रीडा, उद्योग आणि पर्यावरण अशा विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांचा गौरव करण्यात येणार आहे. कार्यक्रमाचे संयोजक पै. नाना डोंगरे म्हणाले, ''महिलांच्या कर्तृत्वाला व्यासपीठ उपलब्ध करून देणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे.



# अगस्ती महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना दिन साजरा

**अकोले । रयत समाचार**

अगस्ती कला, वाणिज्य व दादासाहेब रुपवते विज्ञान महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागात राष्ट्रीय सेवा योजना दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान महाविद्यालयाचे उपप्राचार्य चांगदेव डोंगरे यांनी भूषविले. प्रमुख पाहुणे म्हणून महेश पाडेकर, पर्यवेक्षक विवेककुमार वाकचौरे, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी विकास निमसे, स्टाफ सेक्रेटरी प्रकाश देशमुख, सहकार्यक्रम अधिकारी संतोष आवारी, मनीषा घोडके आदी मान्यवर उपस्थित होते.कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाली. यावेळी प्रमुख व्याख्याते महेश पाडेकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना 'राष्ट्रीय सेवा योजनेचे महत्त्व' या विषयावर भाष्य केले. ते म्हणाले, ''राष्ट्रीय सेवा योजना ही केवळ एक उपक्रम नसून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाची पायरी आहे. समाजसेवा, श्रमदान आणि सामाजिक बांधिलकी यांद्वारे विद्यार्थी समाजात सकारात्मक बदल घडवू शकतात.''अध्यक्षस्थानावरून बोलताना उपप्राचार्य चांगदेव डोंगरे म्हणाले, ''विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणीव निर्माण करण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजना अत्यंत आवश्यक आहे. ही योजना विद्यार्थ्यांना फक्त चांगले गुण मिळवण्यासाठी नाही, तर जबाबदार नागरिक घडवण्यासाठी तयार करते.''या संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यार्थिनी ईश्वरी भोसले हिने केले, तर आभारप्रदर्शन प्राची चौधरी हिने केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजना विभागातील स्वयंसेवक आणि प्राध्यापकांनी विशेष परिश्रम घेतले. हा उपक्रम विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणीव निर्माण करणारा आणि त्यांना राष्ट्रसेवेसाठी प्रेरित करणारा ठरला.

# नवरात्रोत्सवाच्या पहिल्या दिवशी एकल महिलांचा गौरव; सिद्धीविनायक मंच नारी सन्मानाचा जागर

**श्रीरामपूर । सलीमखान पठाण**

हळदीकुंकू व विविध धार्मिक सोहळ्यांमध्ये विधवा किंवा एकल महिलांना दूर ठेवण्याच्या जुन्या रूढी-परंपरेला छेद देत, श्रीरामपूरातील मोरगे वस्तीच्या सिद्धीविनायक महिला मंचाने यंदाच्या नवरात्रोत्सवात परिवर्तनाची नवी दिशा दाखवली. देवीच्या जागराने गाजणाऱ्या या उत्सवात एका एकल महिलेलाच महिला मंचाचे अध्यक्षस्थान देऊन आणि नवरात्रोत्सवाच्या पहिल्याच दिवशी एकल भगिनींच्या हस्ते आरती व देवी प्रतिष्ठापना करून नारी सन्मानाचा व समतेचा संदेश देण्यात आला.

श्रीरामपूर शहरातील मोरगे वस्ती (वॉर्ड क्रमांक ७) येथील सिद्धीविनायक मंदिरात दरवर्षी विविध सण-उत्सव साजरे केले जातात. यंदा नवरात्रोत्सवासाठी परिसरातील महिलांनी एकत्र येत सिद्धीविनायक महिला मंचाच्या वतीने विविध उपक्रमांचे आयोजन केले. या मंचाच्या अध्यक्षा संगिता कुरूंद, उपाध्यक्षा शीतल भंडारी, खजिनदार प्रभा सुरडकर, सचिव स्नेहल लचके असून, ज्योती शिंदे, सविता सुपारे, वैशाली शेळके, नीमा शेळके, वर्षा शिंदे, सीमा संग्रामे, अमृता गायकवाड, चैताली सुरडकर, शीतल



देशमुख, श्रद्धा लचके, दीपिका ठोंबरे, मनीषा शिंदे आदी महिलांचा सक्रिय सहभाग आहे.

अध्यक्षा संगिता कुरूंद या साऊ एकल महिला समितीच्या पदाधिकारी आहेत. समितीच्या पुढाकाराने यापूर्वी श्रीरामपूरच्या आझाद मैदान येथील ७५ वर्षांच्या मानाच्या सार्वजनिक गणेश मंडळाने गणेशोत्सवात एकल महिलांच्या हस्ते गणपतीची आरती घडवून सन्मानित केले होते. त्याच प्रेरणेने यंदा नवरात्रोत्सवात घटस्थापनेच्या मिरवणुकीतही एकल भगिनींना मुख्य प्रवाहात आणण्याचा उपक्रम राबविण्यात आला.

या महिलांनी केशरी फेटे बांधून, संगीत वाद्यांच्या तालावर ठेका धरत देवी प्रतिष्ठापनेच्या मिरवणुकीत उत्साहाने सहभाग घेतला. त्यांच्या सोबत त्यांची मुले, मुली, सासू आणि घरातील इतर मंडळींनीही उत्सवात आनंदाने भाग घेतला. कार्यक्रमादरम्यान एकल महिलांसाठी कार्य करणाऱ्या साऊ एकल महिला समितीचे मिलिंदकुमार साळवे, बाळासाहेब जपे व मुकुंद टंकसाळे यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी मंजुषा गायकवाड, वंदना काळे, दुर्गा नाटकर, अरूणा शेळके, माया जंजिरे, शालिनी ससाणे, पूजा ताथेड, सुलताना शेख आदी महिलांचा देखील सिद्धीविनायक महिला मंचाच्या वतीने भेटवस्तू देऊन गौरव करण्यात आला. या उपक्रमामुळे नवरात्रोत्सव खऱ्या अर्थाने नारी सन्मानाचा जागर ठरला.

## औद्योगिक सहकारी वसाहतीची ६५वी वार्षिक सभा उत्साहात

**कोपरगाव । किसन पवार**

कोपरगाव औद्योगिक सहकारी वसाहतीची ६५ वी वार्षिक सभा उत्साहात पार पडली. या सभेचे अध्यक्षस्थान वसाहतीचे चेअरमन व युवानेते विवेक कोल्हे यांनी भूषवले. सभेच्या सुरुवातीला मागील वर्षाचे इतिवृत्त वाचून मंजूर करण्यात आले. चालू आर्थिक वर्षातील महत्त्वाचे विषय सर्वानुमते मंजूर करून पुढील विकासासाठी उद्दिष्ट निश्चित करण्यात आले. औद्योगिक वसाहतीतील अंतर्गत रस्ते, कारखानदारांना मिळणाऱ्या सुविधा आणि वैशिष्ट्यपूर्ण धोरणांची अंमलबजावणी यामुळे वसाहतीचा विकास झपाट्याने होत असून वसाहत अधिक सक्षम बनत आहे. नवउद्योजकांना प्रोत्साहन देण्यासाठी सभेत विशेष सन्मान करण्यात आला. पल्लवी गोरक्षनाथ खळेकर यांना नवउद्योजक पुरस्कार, वंदना शरद पाटोळे यांना आदर्श उद्योजक पुरस्कार तर साईनाथ रंगनाथ राहणे यांना कोपरगाव तालुक्यातील नवउद्योजक पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी बोलताना चेअरमन विवेक कोल्हे यांनी वसाहतीमध्ये नाविन्यपूर्ण सुधारणा आणि आवश्यक ती विकासकामे करण्यासाठी संचालक मंडळ सातत्याने प्रयत्नशील असल्याचे सांगितले. ''कारखानदार आणि गाळाधारक यांचे हित जपण्यासाठी सकारात्मक निर्णय विविध पातळ्यांवर घेतले जातील. औद्योगिक वसाहत ही केवळ कारखानदारांसाठी नाही तर संपूर्ण तालुक्याच्या आर्थिक प्रगतीचे केंद्रबिंदू आहे,'' असेही त्यांनी नमूद केले. सभेत जवळके येथील नवउद्योजक साईनाथ राहणे यांनी आपल्या भागातील रस्त्यांची आणि बससेवेची दयनीय अवस्था मांडली. त्यावर प्रतिक्रिया देताना विवेक कोल्हे म्हणाले, ''तालुक्यातील रस्त्यांची समस्या गंभीर आहे. उद्योजकांना चांगले रस्ते मिळाले तर व्यवसायाला गती निर्माण होईल,'' असे सांगत बस आगारातील बससंख्या लोकसंख्येच्या तुलनेत कमी असल्यावरही भाष्य केले. या सभेला उपाध्यक्ष केशव भवर, गोदावरी दूध संघाचे चेअरमन राजेश परजणे, कोल्हे कारखाना संचालक ज्ञानेश्वर परजणे, माजी संचालक गुलाबराव वरकड, बाळासाहेब शेटे, औद्योगिक वसाहत माजी चेअरमन राजेंद्र शिंदे, तसेच कारखानदार, गाळाधारक व उद्योजक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सभेच्या यशस्वी आयोजनामुळे कोपरगाव औद्योगिक वसाहतीच्या विकासाला नवे बळ मिळाले असून पुढील काळातही सर्वांगीण विकास वेगाने होत राहील, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.


रयत समाचार Classified छोटी जाहिरात

छोटी जाहिरात, उत्तम प्रतिसाद

खरेदी विक्री । नोकरी विषयक । नावात बदल
आरोग्य विषयक । वाढदिवस । विवाह विषयक




निसार Art
सर्व प्रकारच्या व्यावसायिक क्षेत्रातील वॉल पेन्टीग जाहिरात (भिंत पेंटिंग) साठी राज्यातील नावाजलेले निसार आर्ट
7020356335 | 9860830016
पत्ता : प्लॉट नं.३, नवीन महानगरपालिकेसमोर, औरंगाबाद रोड, अ.नगर.

रावसाहेबचा चहा, एकदा पिऊन पहा!
कोतवाली पोलीसस्टेशन शेजारील सुप्रसिध्द
जगदंबा टी सेंटर
चहा, कॉफी, लेमन टी
शाखा नं.१- माणिक चौक, अ.नगर
शाखा नं.२- वसंत टॉकीजजवळ, भोला पान सेन्टर शेजारी, अ.नगर
प्रो.प्रा. रावसाहेब ठोंबे
97655 58585

हॉटेल भाड्याने देणे
नगर-सोलापूर हायवेपासून पाच मिनिटांच्या अंतरावर असणाऱ्या कानडेमळा येथील सारसनगर चौकातील सुस्थितीत असणारे हॉटेल भाड्याने चालविण्यास देणे आहे. किमान ३० ते ५० लोक एकावेळी बसतील अशी पीओपी आणि लाईट फिटिंगसह बैठक व्यवस्था, व्हेज-नॉन, व्हेजसाठी स्वतंत्र किचन, सर्व किचन साहित्य टेबल, सोफे, पाण्याची व्यवस्था इत्यादीसह देणे आहे.
- संपर्क -
९०११११३७००

सर्व प्रकारच्या छोट्या जाहीरातींसाठी ८८०५४०१८०० | ७७७४००१८०० | ९८२२४९६६६४ या क्रमांकावर संपर्क करा


हे दैनिक प्रकाशक, मालक, संपादक, भैरवनाथ तुकाराम वाकळे, 8805401800 यांनी मुद्रक आबीदखान दुलेखान यांच्या मखदुम प्रिंटर्स,३५८८, माणिक चौक, अहमदनगर येथे छापून तेथेच प्रसिध्द केले. कार्यालयाचा पत्ता : ५, गजानन अपार्टमेंट, झोपडी कॅन्टीन, मनमाडरोड, सावेडी, अहमदनगर-०३.कार्यालय, 8805401800 **Email : rayatsamachar007@gmail.com , उपसंपादक :** दिपक शिरसाठ, 7774001800, **समूह संपादक : प्रभाकर ढगे, पणजी, गोवा,** 9373021584, **गोवा कार्यालय : १३१, गोमंतक प्रेस जवळ, सांतिनेज, पणजी - गोवा, कर्नाटक कार्यालय : श्रीकांत काकतीकर, निवासी संपादक,१९१, बॅ.नाथ पै चौक, पोस्ट ऑफीसच्या मागे, शहापूर, बेळगाव कर्नाटक,** 9036799516,shrikantkaktikar@gmail.com (वाद-विवाद अहमदनगर न्यायालयीन न्यायकक्षेत)

# इस्रो शैक्षणिक सहल उपक्रम विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी- डॉ. अंगरख

रयत समाचार

**शेवगाव । लक्ष्मण मडके**

विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन वाढावा, संशोधन वृत्तीची जडणघडण व्हावी यासाठी जिल्हा परिषदेतर्फे राबविण्यात येणारा इस्रो शैक्षणिक सहलीचा उपक्रम विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरत असल्याचे डॉ. प्रशांत अंगरख यांनी प्रतिपादन केले.

चेड़ेचांदगाव (ता. शेवगाव) येथील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेत आयोजित व्याख्यानात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी डॉ. अंगरख यांचे वडील व भारतीय रेल्वेचे निवृत्त लोकोपायलट प्रकाश अंगरख उपस्थित होते.

या वेळी यंदाच्या इस्रो शैक्षणिक सहलीसाठी शेवगाव तालुक्यातून निवड झालेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा प्रथमेश नेमाणे (पाचवी, चेडेचांदगाव), सुदर्शन दगडखैर (सहावी, पिंगेवाडी), मयुरी दसपुते (आठवी,



खामपिंप्री) शाल, श्रीफळ व गगनयान मोहिमेवरील पोस्टर देऊन सत्कार करण्यात आला.

डॉ. अंगरख यांनी इस्रोची स्थापना, विविध अंतराळ मोहिमा, गगनयान व चांद्रयानसह सुरु असलेल्या अंतराळ उपक्रमांची माहिती विद्यार्थ्यांना दिली.

या उपक्रमाचे कौतुक पंचायत समितीच्या गटशिक्षणाधिकारी शैलजा राऊळ व शिक्षण विस्तार अधिकारी डॉ. शंकर गाडेकर यांनी फोनद्वारे केले.

कार्यक्रमाला सरपंच द्रोपदा बोरूडे, मच्छिंद्र जायभाये, भरत चेडे, निलेश ढाकणे, अर्जून ढाकणे, भारत नेमाणे, नामदेव दसपुते यांच्यासह मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.

प्रास्ताविक मुख्याध्यापक रमेश खरात, सूत्रसंचालन अर्जून घुले, आभार रणजित गटकळ यांनी मानले.

> विद्यार्थ्यांसाठी इस्रोत संधी- डॉ. अंगरख
>
> इस्रोच्या हैदराबाद केंद्रात कार्यरत असलेले डॉ. प्रशांत अंगरख हे पिंगेवाडी (ता. शेवगाव) येथील सुपुत्र आहेत. गावी सुट्टीवर आल्यावर त्यांनी चेडेचांदगाव शाळेत विद्यार्थ्यांशी संवाद साधला. 'अभ्यास, जिद्द, चिकाटी व मेहनत घेतली, तर ग्रामीण भागातील विद्यार्थीही इस्रोसारख्या नामवंत संस्थेत स्थान मिळवू शकतात, असे त्यांनी सांगितले.

# साप्ताहिक 'वादळी स्वातंत्र्य' सन्मान पुरस्कारचे ५ ऑक्टोबरला वितरण

**श्रीगोंदा । माधव बनसुडे**

साप्ताहिक वादळी स्वातंत्र्याच्या वर्धापन दिनानिमित्त, विविध क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या संस्था व व्यक्तींना दिला जाणारा ''वादळी सन्मान पुरस्कार २०२५'' रविवार, ता. ५ ऑक्टोबर २०२५ रोजी श्रीगोंदा येथील नगरपरिषद सभागृहात मान्यवरांच्या हस्ते वितरण केला जाणार आहे. ही माहिती साप्ताहिक वादळी स्वातंत्र्याचे संपादक जितेंद्र पितळे यांनी दिली. या वर्षी पुरस्कार विविध क्षेत्रांमध्ये प्रदान केले जाणार आहेत. सामाजिक क्षेत्रातील पुरस्कारार्थी गोरक्षनाथ ओहळ लोणी, प्राचार्या माधुरी प्रमोद काकडे (दौंड), केरबा घोडके (पेडगाव), गोकुळदास कोपनर (पुणे), सुनील पवार (दौंड), चंद्रकात रहिंज काष्टी यांचा समावेश आहे. कृषी क्षेत्रातील पुरस्कारार्थी विजयबापु मोकाशी (इनामगाव), ज्ञानदेव लाढाने (बेलवंडी), दत्तात्रय हिरडे (श्रीगोंदा) आहेत. पत्रकारीता



क्षेत्रात अमोल झेंडे, सोहेल शेख, गणेश जेवरे, दत्ता पाचपुते, भगवान गायकवाड यांना सन्मानित केले जाणार आहे. विधी सेवा क्षेत्रातील ॲड. आशीष सुसरे, ॲड. जुबेर शेख, ॲड. संदीप भोईटे, सहकार क्षेत्रातील राजेंद्र नीलकंठ नागवडे, ओमराजे बोत्रे पाटील, मिठूशेठ शिंदे, शिक्षण क्षेत्रातील पल्लवी शिंदे, प्रमोद शिर्के, नितीन भोईटे, सुनीता लोखंडे, संतोष सोनवणे, राजेंद्र माने, शरद तरटे यांचा समावेश आहे. वैद्यकीय क्षेत्रातील पुरस्कारार्थी डॉ. संपदा रोहन खवटे, डॉ. सोनाली उल्हास बांदल, डॉ. वैशाली लगड, डॉ. निलेश पाटील, प्रशासकीय क्षेत्रातील सुनील नेरूकर, क्रांती चौधरी, पुष्पगंधा भगत, ज्ञानेश कोरे, अध्यात्म क्षेत्रातील रावसाहेब चिपलकर , आबासाहेब नरके महाराज, पर्यावरण क्षेत्रातील राजू परकाळे, ओंकार अस्वले, वसुंधरा वृंद, शिवदुर्ग टेकर्स, उद्योग क्षेत्रातील किशोर बोगावत, बाळासाहेब नरवडे, संदीप धुमाळ, महावीर पटवा, भाऊसाहेब दांडेकर, राजकीय क्षेत्रातील आमदार अमिन गोरखे, आमदार विक्रमसिंह पाचपुते, आमदार हेमंत उगले, शुभांगी सप्रे, दीप्ती सुरेंद्र गांधी, संदीप नागवडे, कृष्णा दिपक नागवडे आहेत. याशिवाय वृत्तपत्र विक्रेते (विशेष पुरस्कार) माधव बनसुडे (श्रीगोंदा), रमाकांत क्षीरसागर (काष्टी) यांचा सन्मान केला जाणार आहे. हा पुरस्कार वितरण सोहळा श्रीगोंदा नगरपरिषद सभागृहात आयोजित करण्यात येत असून विविध क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या व्यक्ती व संस्थांना गौरवण्यात येणार आहे.

# झाड पडल्यामुळे थांबली लालपरी, मदतीला धावून आले गावकरी

**नगर तालुका । रयत समाचार**

तालुक्यातील नगरवांबोरी रस्ता मंगळवार, ता. २३ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी वाहतूक ठप्प झाली, कारण पिंपळगाव माळवी तलावाजवळ रात्री झालेल्या जोरदार पावसामुळे एक जुनाट झाड रस्त्यावर पडले होते. या रस्त्यावरून एसटी बस तसेच इतर वाहतूक मार्ग चालत होती, ज्यात परिसरातील कॉलेज विद्यार्थी व शासकीय कर्मचारी होते. या परिस्थितीत प्रवाशांचा जीव धोक्यात होता. स्थानिक ग्रामस्थांनी तत्परतेने पुढाकार घेत झाड तोडण्यास सुरुवात केली. समृद्धी योगा ग्रुप चे सदस्य माजी सरपंच योगेश



झिने, पत्रकार खासेराव साबळे, भाऊसाहेब झिने, संतोष बनकर, ऑननरी कॅप्टन हरीराम शिंदे, बाळासाहेब रासकर, कांचन बनकर यांनी साहित्य गोळा करून झाड तोडले. एसटीचे चालक, वाहक व ग्रामस्थांच्या प्रयत्नांनी सुमारे अर्ध्या तासात रस्ता मोकळा झाला आणि वाहतूक सुरळीत झाली. प्रवाशांनी ग्रामस्थांच्या तत्परतेचे कौतुक केले आणि ही घटना सामाजिक बांधिलकी व एकजुटीचे उत्तम उदाहरण ठरली असल्याचे सांगितले. या घटना पाहून नागरिकांनी ग्रामस्थांच्या सहकार्यामुळे मोठा अपघात टळला आणि रस्त्यावरून सुरक्षितपणे वाहतूक सुरु राहू शकली.



# जवळा मुंजेवाडी तलाव ओव्हरफ्लो सरपंच आव्हाड यांनी घेतला आढावा

**रयत समाचार । जामखेड । रिजवान शेख**

गेल्या काही दिवसांपासून झालेल्या मुसळधार पावसामुळे जवळा मुंजेवाडी तलाव जलसंपन्न झाला असून मंगळवारी सकाळपासून तलाव ओव्हरफ्लो होऊ लागला. या अनुषंगाने जवळा गावचे सरपंच सुशील आव्हाड यांनी स्वतः स्थळ पाहणी करून परिस्थितीचा आढावा घेतला. तलावाच्या पाणलोट क्षेत्रात गेल्या आठवड्याभरात चांगला पाऊस झाल्याने तलावात पाण्याची आवक झपाट्याने वाढली. मंगळवारीसकाळीपाण्याचीपातळीकमालमर्यादेलापोहोचल्यावर ओव्हरफ्लो सुरू झाला. तलाव परिसरात ग्रामस्थ, शेतकरी तसेच युवक मोठ्या संख्येने जमून निसर्गरम्य दृश्याचा आनंद घेत होते. सरपंच सुशील आव्हाड यांनी तलावाची स्थिती, पाण्याचा निचरा होणाऱ्या मार्गांची तपासणी केली. त्यांनी ग्रामपंचायत सदस्य व स्थानिक प्रशासनाला सतर्क राहण्याचे आवाहन केले. आव्हाड म्हणाले, ''तलाव भरून ओव्हरफ्लो होणे हे गावासाठी आनंदाची बाब आहे. मात्र सुरक्षिततेच्या दृष्टीने काळजी घेणे गरजेचे आहे. तलावाजवळ अनावश्यक गर्दी टाळावी व लहान मुलांना पाण्याजवळ जाऊ देऊ नये.'' स्थानिक शेतकऱ्यांनी तलाव ओव्हरफ्लो झाल्यामुळे या वर्षीच्या पिकांना पुरेसे पाणी उपलब्ध होईल, अशी आशा व्यक्त केली. काही युवकांनी तलाव परिसरातील स्वच्छतेबाबत लक्ष देण्याची गरज व्यक्त केली. तलावाच्या ओव्हरफ्लोमुळे जवळा आणि परिसरातील शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले असून पाण्याच्या साठ्यामुळे भविष्यात पिकांच्या उत्पादनावर चांगला परिणाम होण्याची शक्यता आहे.

# कै.मुरलीधर होनराव जयंतीनिमित्त भव्य रक्तदान शिबिर

रयत समाचार

**श्रीगोदा । माधव बनसुडे**

येथील शारदा विद्या निकेतनचे संस्थापक अध्यक्ष कै. मुरलीधर (आण्णा) होनराव यांच्या ९३ व्या जयंतीनिमित्त शुक्रवार, ता. २६ सप्टेंबर २०२५ रोजी भव्य रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले. याबाबत माहिती प्राचार्य बी.टी. मखरे यांनी दिली. कै. मुरलीधर (आण्णा) होनराव यांनी अत्यंत कठीण परिस्थितीतून मुलं वंचित राहू नयेत यासाठी शिक्षण क्षेत्रात १९९१ साली भाववाढीच्या माध्यमातून शिक्षणाचे बीज रोवले, जे आज मोठ्या महाकाय वृक्षासारखे फुलले आहे.

त्यांच्या प्रयत्नांमुळे अनेक गरजू व गरीब मुलं-मुली शिक्षण घेऊ शकत आहेत.

त्यांच्या सामाजिक व सांस्कृतिक कार्याची प्रेरणा लक्षात घेऊन रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

प्राचार्य बी. टी. मखरे यांनी नागरिकांना आवाहन केले की, शिबिरात सहभागी होऊन रक्तदान करून गरजूंची मदत



करावी.

शिबिरामध्ये अनेक रक्तदात्यांनी सहभाग नोंदवून जयंती निमित्त मान्यवरांच्या स्मरणार्थ समाजात योगदान दिले.

# शनि घोटाळाप्रकरणी सुप्रीम कोर्टात याचिका ईडी, सीबीआय मार्फत चौकशीची मागणी

**नेवासा । रयत समाचार**

सध्या देशभरात गाजत असलेल्या शनिशिंगणापूर देवस्थानातील ॲप घोटाळा, बोगस कर्मचारी भरती, बनावट पावती घोटाळा, सोने-चांदी-मुकुट व दागिन्यांचा गहाळ प्रकरण, तसेच भक्तांच्या देणग्या घोटाळ्यांबाबत कारवाईसाठी सोनई येथील सामाजिक कार्यकर्ते सचिन प्रभाकर दरंदले यांनी सुप्रीम कोर्टात ता. २२ सप्टेंबर २०२५ रोजी क्रमांक ५४८०८/२०२५ नुसार याचिका दाखल केली आहे.दरंदले यांनी याचिकेत मागणी केली आहे की, शनिशिंगणापूर देवस्थानातील ऑनलाईन ॲप घोटाळा, कोड घोटाळा, पावती पुस्तक घोटाळा, बोगस कर्मचारी भरती, विविध संस्थांना दिलेल्या देणगी घोटाळे आणि भाविकांच्या देणगी स्वरुपातील दागिने गहाळ झालेले प्रकरण याची . व .. मार्फत चौकशी केली जावी. तसेच, केंद्रीय कमिटीकडून मागील दहा वर्षांचे ऑडिट करण्यात यावे, असेही त्यांनी याचिकेत नमूद केले आहे. याचिकेत सांगण्यात आले आहे की, विधानसभेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी वाचून दाखवलेले घोटाळे, धर्मदाय आयुक्तांच्या चौकशी आदेश, देवस्थानाचे उपकार्यकारी अधिकारी यांनी केलेली आत्महत्या यांसारख्या घटनांमुळे परिसरात रोष आणि संशयाचे वातावरण निर्माण झाले आहे.दरंदले यांनी म्हटले की, सुप्रीम कोर्टात याचिका दाखल झाल्यानंतर तत्काळ रात्री ८ वाजता देवस्थान बरखास्तीचा शासन निर्णय (..) जाहीर झाला, परंतु कारवाई न झाल्याने काही दोषींना अटक होण्याची शक्यता असल्याने परिसरात घाबराटीचे वातावरण पसरले आहे.

सामाजिक कार्यकर्ते दरंदले यांनी सर्व शनी भक्तांना आवाहन केले आहे की, जर त्यांच्या देवस्थान, कर्मचारी किंवा अधिकारी यांच्या मार्फत कोणतीही फसवणूक झाली असेल तर ते त्यांच्या संपर्कात येऊन माहिती द्यावी.



# शिंगणापूर देवस्थान बरखास्तीचा निर्णय फटाक्यांची आतिशबाजी, पेढेवाटप, जल्लोष

## महायुतीचे मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित

**रयतसमाचार।नेवासा।विजयखंडागळे**

अधिनियम २०१८ व शासन निर्णयानुसार, शनिशिंगणापूर देवस्थान बरखास्त झाला, त्यानंतर स्थानिक व महायुती पक्षाच्या कार्यकर्त्यांनी शनि महाद्वार समोर फटाक्यांची आतिशबाजी करून आणि शनी भक्तांना पेढे वाटून या निर्णयाचे उत्साहात स्वागत केले.स्थानिक ग्रामस्थांसह भाजपा, शिवसेना व राष्ट्रवादी महायुती पक्षाचे कार्यकर्ते दुपारी बाराच्या सुमारास शनि आरतीला उपस्थित राहिले, विधिवत पूजा-अभिषेक करून शनिदेवाला पेढे अर्पण केले.यावेळी दहा वर्षांपासून देवस्थानाच्या कामकाजासाठी संघर्ष करणारे युवा कार्यकर्ते ऋषिकेश शेटे यांचा देवस्थानच्या वतीने स्थानिक ग्रामस्थ दादा गायाळ व गोरख दरंदले यांनी सत्कार केला.श्री शनिशिंगणापूर देवस्थानामध्ये अनियमितता, बनावट ॲप्स घोटाळा, आर्थिक गैरव्यवहार, कर्मचाऱ्यांमध्ये वादविवाद, उपकार्यकारी अधिकाऱ्यांच्या आत्महत्येसारख्या गंभीर घटना निदर्शनास आल्यामुळे भाविकांमध्ये रोष निर्माण झाला. या पार्श्वभूमीवर शासनाने देवस्थान बरखास्तीचा निर्णय घेतला.माजी मुख्य कार्यकारी अधिकारी उदयकुमार बल्लाळ यांनी सांगितले की, ''जोपर्यंत देवस्थानात राजकीय हस्तक्षेप असेल, तोपर्यंत शनि दर्शनाला येणार नाही.'' मात्र शासनाच्या बरखास्तीच्या निर्णयानंतर बल्लाळ शनिशिंगणापूर येऊन शनि देवासमोर नतमस्तक झाले, असे त्यांनी नमूद केले.यावेळी भाजपा ओबीसी मोर्चा जिल्हा उपाध्यक्ष देविदास साळुंखे, माजी उपसभापती मार्केट कमेटी नेवासा, तसेच डॉ. कोलते, सुभाष पवार, विशाल धनगर, प्रमोद घावटे, तुळशीराम शिंदे, आदिनाथ पटारे, सखाहारी पवार, नामदेव जाधव, माऊली पागिरे, प्रकाश गायके, पोपट शेकडे, रामकृष्ण आगळे, किरण जावळे, सौरभ गवळी, नाना साहेब दौले, शुभम वाघ, नानासाहेब ढेरे, सचिन गवांदे, दादा घायाळ, रोहित जामदार, विलास भालके, संदीप चव्हाण, महेश सोनवणे, अमोल गायकवाड, प्रदीप जाधव, सुधीर झिने यांसह महायुतीचे मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते. स्थानिकांनी शासन निर्णयाचे स्वागत करत देवस्थानातील सुव्यवस्था आणि शांतता राखण्याचे महत्त्व अधोरेखित केले.

# रेवजी कोतकर यांचे निधन

**नगर तालुका । रयत समाचार**

निंबळक येथील प्रगतिशील शेतकरी रेवजी रामजी कोतकर यांचे रविवार, ता. २१ सप्टेंबर रोजी वयाच्या ९४ व्या वर्षी वृद्धापकाळाने निधन झाले. ते नाना म्हणून सर्वत्र परिचित होते. धार्मिक व सामाजिक क्षेत्रात त्यांचा उल्लेखनीय सहभाग होता. पंचक्रोशीत ते हाडांचे वैद्य म्हणून प्रसिद्ध होते.त्यांच्या पश्चात एक मुलगा, दोन मुली व नातवंडे असा परिवार आहे. निवृत्त बी.एस.एफ. हवालदार आबासाहेब कोतकर यांचे ते वडील होत, तर माजी जिल्हा नियोजन समिती सदस्य अविनाश भाऊसाहेब कोतकर आणि ग्रामविकास विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष नितिन भाऊसाहेब कोतकर यांचे ते आजोबा होत.



**रयत समाचार :** तुळजाभवानीदेवीच्या यात्रेनिमित्त तिसऱ्या माळीला पालखी मिरवणूक काढली गेली. प्रथमच ट्रॅक्टरवरून निघालेल्या पालखीमुळे भाविकांना दर्शन घेणे सुलभ झाले, लहान मुलांना पालखीखालून जाण्याची पारंपरिक प्रथा आजही आहे. (छाया- विजय मते)

# मंजुळ आवाजाचे पार्श्वगायक एस.पी. बालसुब्रमण्यम

हिंदी चित्रपटसृष्टीतील मंजुळ आवाजाचे पार्श्वगायक एस.पी. बालसुब्रमण्यम यांचा आज पाचवा स्मृतिदिन. पाच वर्षापूर्वी २५ सप्टेंबर २०२० रोजी वयाच्या ७४ व्या वर्षी एस.पी. बालसुब्रमण्यम यांचे कोरोनाने निधन झाले होते. त्यांच्या निधनाने रसिकांनी हळहळ व्यक्त केली होती कारण एस.पी.बालसुब्रमण्यम हे रसिकांचे आवडते पार्श्वगायक होते. त्यांचे निधन रसिकांना चटका लावून जाणारे ठरले. एस.पी.बालसुब्रमण्यम यांचा जन्म ४ जून १९४६ रोजी आंध्रप्रदेश मधील नेल्लोर येथील मेहुआ या गावी झाला. त्यांचे पूर्ण नाव श्रीपती पंडितराध्युला बालसुब्रमण्यम असे होते. एस.पी. बालसुब्रमण्यम यांचे वडील हरिकथा गायक होते. आंध्रप्रदेश मधील हे पारंपरिक लोकसंगीत आहे त्यात कविता, कथा, गायन, नृत्य यासह सर्व प्रकारांचा समावेश असतो. एस.पी. बालसुब्रमण्यम यांचे वडील नाटकातही काम करत. एस.पी. यांना एक भाऊ व दोन बहिण आहेत. एस.पी. यांनी मोठे होऊन इंजिनिअर व्हावे अशी त्यांच्या वडिलांची इच्छा होती पण ती पूर्ण होऊ शकली नाही. एस.पी. बालसुब्रमण्यम यांना लहानपणापासूनच गायनाची आवड होती त्यामुळे त्यांनी गायनातच करिअर करायचे असे ठरवले आणि त्यांनी व्यावसायिक गायनास सुरुवात केली. १९६४ साली त्यांना गायनात पहिले पारितोषिक मिळाले. त्यानंतर त्यांचे नाव सर्वदूर पोहचले. सुरुवातीला त्यांनी आपल्या मातृभाषेत म्हणजे तेलगू भाषेत गाणी गायला सुरुवात केली नंतर त्यांनी तमिळ, मल्याळम आणि कन्नड या दक्षिण भारतीय भाषेतही गाणी गायला सुरुवात केली. दक्षिणात्य भाषेत त्यांनी गायलेली गाणी लोकप्रिय होऊ लगली. त्याची लोकप्रियता दिवसेंदिवस वाढू लागली. त्यांच्या मंजुळ आवाजाने रसिकांना वेड लावले. त्यांचा आवाज आणि त्यांनी गायलेली गाणी रसिकांना इतकी आवडली की रसिकांनी त्यांना दक्षिणेतील. मोहम्मद रफी अशी पदवी दिली. दक्षिणेकडून त्यांनी आपला मोर्चा हिंदी चित्रपट सृष्टीकडे वळवला. हिंदी चित्रपट सृष्टीत प्रवेश केल्यावर त्यांना एक दुजे के लिये या चित्रपटात गाण्याची संधी मिळाली. या चित्रपटात त्यांनी गायलेली सर्व गाणी खूप गाजली. आजही या चित्रपटातील त्यांनी गायलेली गाणी प्रेक्षकांच्या ओठावर आहेत. या चित्रपटात त्यांनी गायलेले हम बने तुम बने एक दुजे के लिये.... या गाण्यासाठी त्यांना सर्वोत्कृष्ट पार्श्वगायकचा राष्ट्रीय पुरस्कार मिळाला. एस.पी.च्या पहिल्याच चित्रपटाला राष्ट्रीय पुरस्कार मिळाल्याने त्यांचे नाव देशभर झाले. एस.पी. बालसुब्रमण्यम यांनी गायलेल्या पहिल्याच चित्रपटातील गाणी गाजल्याने त्यांना अनेक चित्रपटात गाण्याची संधी मिळाली. अनेक संगीतकार त्यांना आपल्याकडे गाणी गाण्यासाठी गळ घालू लागले. पुढे त्यांनी अनेक चित्रपटात गाणी गायली ती गाणी लोकप्रियही झाली. हिंदी चित्रपट सृष्टीत त्यांचे आता चांगले बस्तान बसले. पत्थर के फुल, बागी, हम आपके है कौन? साजन, रोजा या चित्रपटात त्यानी गायलेली गाणी खूप गाजली. सलमान खानचा पहिला चित्रपट असलेल्या मैने प्यार किया या चित्रपटात त्यांनी सलमानचा आवाज बनून गाणी गायली. या चित्रपटात त्यांनी गायलेली सर्व गाणी खूप गाजली. सलमान खानला सुपरस्टार करण्यात एस.पी. बालसुब्रमण्यम यांचा मोलाचा वाटा होता असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. सलमान खानच्या अनेक गाण्यांना त्यांचाच आवाज होता. सलमान खान आणि एस.पी. हे जणू एकाच नाण्याच्या दोन बाजू होते. १९९० च्या दशकात त्यांनी गायलेली सर्वच गाणी लोकप्रिय झाली. एस.पी. यांनी १६ भाषांमधून ४० हजारांहून अधिक गाणी गायली. ८ फेब्रुवारी १९८१ रोजी सकाळी ९ ते रात्री ९ अशा १२ तासात तब्बल २१ कन्नड गाणी रेकॉर्ड करून त्यांनी विश्वविक्रम केला जो गिनिज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड मध्ये नोंदला गेला. एस.पी. यांनी जवळपास पाच दशके आपल्या मंजुळ आवाजाने रसिकांना मंत्रमुग्ध केले. त्यांच्या आवाजाची मोहिनीच अशी होती की जो त्यांचा आवाज ऐकेल तो त्यांच्या प्रेमात पडेल. त्यांना अनेक पुरस्कार मिळाले. त्यांना तब्बल अर्धा डझन राष्ट्रीय पुरस्कार मिळाले. शिवाय अनेक फिल्मफेअर, स्क्रीन पुरस्कार मिळाले. भारत सरकारनेही त्यांना पद्मभूषण हा मानाचा पुरस्कार देऊन गौरवले. रसिकांचे आवडते आणि रसिकांच्या मनात आदराचे स्थान असलेल्या या गायकाचे कोरोनाने अचानक निधन झाल्याने रसिकांना मोठा धक्का बसला होता. मंजुळ आवाजाचे जेष्ठ पार्श्वगायक एस.पी. बालसुब्रमण्यम यांना स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!



**श्याम बसप्पा ठाणेदार**
दौंड, जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

**समाजसंवाद**

# जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकीचा बिगुल वाजला

## मतदारयादी कार्यक्रम जाहीर; ८ ते १४ ऑक्टोबर हरकती

रयत समाचार

**बेलापूर । शफीक बागवान**

राज्यातील ३२ जिल्हा परिषदा व ३३६ पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी राज्य निवडणूक आयोगाने मंगळवार, ता.२३ मतदार यादीचा कार्यक्रम जाहीर केला आहे. त्यानुसार प्रारुप मतदार यादीवर ता. ८ ते १४ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत हरकती व सूचना दाखल करता येतील.

राज्य निवडणूक आयोगाने ता. १ जुलै २०२५ हा अधिसूचित तारीख निश्चित केली आहे. त्या दिवशी अस्तित्वात असलेली विधानसभेची मतदार यादी या निवडणुकांसाठी वापरण्यात येणार आहे. जिल्हा परिषद निवडणूक विभाग व पंचायत समिती निर्वाचक गणनिहाय प्रारुप मतदार यादी ता. ८ ऑक्टोबर २०२५ रोजी प्रसिद्ध केली जाईल. त्यावर ता. १४ ऑक्टोबर २०२५ पर्यंत हरकती व सूचना दाखल करता येतील. अंतिम मतदार यादी व मतदान केंद्रनिहाय मतदार यादी २७ ऑक्टोबर २०२५ रोजी जाहीर केली जाईल. निवडणूक विभाग व निर्वाचक गणनिहाय मतदार याद्या तयार करताना विधानसभा मतदारसंघाच्या यादीप्रमाणेच मतदार याद्यांमध्ये मतदारांची नावे व पत्ते कायम ठेवले जातात. या याद्यांमध्ये नवीन नावांचा समावेश करणे, नावे वगळणे, नावे किंवा पत्त्यांमध्ये दुरूस्ती करणे इत्यादी स्वरूपाची कार्यवाही राज्य निवडणूक आयोगाकडून केली जात नाही. हरकती व सूचनांच्या अनुषंगाने केवळ मतदार याद्यांचे विभाजन करताना लेखनिकांकडून होणाऱ्या चुका, मतदाराचा चुकून निवडणूक विभाग किंवा निर्वाचक गण बदलणे, विधानसभेच्या यादीत नाव असूनही प्रभागाच्या यादीत नाव नसणे आदींसंदर्भातील दुरूस्त्या हरकती व सूचनांच्या अनुषंगाने करण्यात येतात.

# सत्यशोधक चळवळ आणि कबीर मठ

म. फुले,ज्ञानगिरी बाबा आणि गोपाळ बाबा वलंगकरआणि इतर सत्यशोधकांच्या बैठकीचे आणि विचार मंथनाचे ठिकाण म्हणून फुले चरित्रात कबीर मठाचे उल्लेख येतात.२०२१मध्ये गोपाळबाबा वलंगकर यांचे चरित्र लिहीत असताना अनेकदा कबीर मठाचे संदर्भ वाचण्यात आले तसेच सत्यशोधक समाजाच्या वैचारिक जडणघडणीमध्ये या स्थळाचे असलेले महत्त्व मला समजले. या स्थळाला भेट देण्याची इच्छा अनेकदा मनात आली. २०२२मध्ये मी पुण्यात वास्तव्यास आलो तेंव्हापासून फुले आंबेडकरी चळवळीच्या ऐतिहासिकदृष्टया महत्वपूर्ण पण दुर्लक्षित असलेल्या अनेक स्थळांना भेटी देणे माझा छंद बनला. सत्यशोधक चळवळीचे वैचारिक केंद्र असलेल्या कबीर मठाबद्दल मला उत्सुकता होतीच.

फुले आंबेडकरी चळवळीतील अनेक दुर्लक्षित स्थळांना भेटी देण्यासाठी सत्यशोधक विचारवंत रमेश राक्षे यांची अनेकदा मदत झाली आहे.

कबीर मठाला ही भेट दयावी या हेतूने त्यांना मी कबीर मठाचा ठावठिकाणा विचारला. तर ते म्हणाले की'' सरळ माझ्या घरी राजेवाडीमध्ये या चहा घेऊ,तेथून जवळच आहे, सोबतच जाऊ!'' पुण्यातील नाना पेठेतील ए. डी. कॅम्प चौक, लागूनच डी.सी. मिशनचे अहिल्याश्रम बोर्डिंग आणि शाळा,तिथून जवळच गंजपेठेत महात्मा फुले वाडा लागूनच लहुजी वस्ताद यांची तालीम, बाजूला भवानी पेठ वेताळपेठ हा सर्व सामाजिक सांस्कृतिक चळवळीचा बालेकिल्ला असलेला भाग.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवन, मालधक्का चौकापासून चौथा चौक म्हणजे कबीर चौक. तेथेच कबीर मठ ही इमारत आहे. कबीर भवन अर्थात कबीर मठ हे महात्मा फुलेंचे अगोदर स्थापन झालेले दिसून येते विक्रम सावंत १७९१ म्हणजे इ.सन १७३४ यावर्षी या मठाची स्थापना झाल्याचे वर लिहिलेल्या पाठीवरून दिसून येते. पुण्यातील या सामाजिक सांस्कृतिक लढ्याचे केंद्रस्थान असलेला हा परिसर अनेक सामाजिक स्थित्यंतरांचा साक्षीदार आहे.या ठिकाणी महात्मा ज्योतिराव फुले आणि त्यांच्या सत्यशोधक चळवळीतील कार्यकर्त्यांचा राबता होता त्यांच्या अनेक बैठका या परिसरात होत असत कबीर मठ हा संत कबीराच्या विचारांची शिकवण देणारे महत्त्वाचे केंद्र आहे.

ज्ञानगिरी बाबा गोसावी हे आजच्या छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याच्या गंगापूर तालुक्यातील नेऊर गावचे रहिवासी असलेले म. फुले यांचे सहकारी हे अनेक भाषांचे जाणकारआणि अभ्यासू असलेले उत्तम प्रवचनकार होते. कबीर मठात उतरत व दर रविवारी भरणाऱ्या सत्यशोधक समाजाच्या बैठकीला उपस्थित राहत ब्राह्मणी धर्माने लाभलेल्या धार्मिक गुलामगिरीतून शुद्रातिशूद्रांनी कोणता कार्यक्रम हाती घ्यावा याची चर्चा या बैठकीत झाले त्यात ज्ञानगिरी बाबा भाग घेत तुकाराम पिंजन त्यासंबंधी लिहितात, ''ज्ञानगिरी बाबा हे इतर मंडळी बरोबर फुल्यांकडे दररोज रात्री सात ते नऊ या वेळेत येत असत कबीरांनी लिहिलेल्या बीजक या ग्रंथातील विप्रमती हा भाग वाचून दाखवीत विप्रमती हा भाग ब्रिजभाषेत लिहिला होता ज्ञानगिरी बाबा त्याचा अर्थ मराठीत सुंदर विवेचन करुन सांगत असत. भारतातील जातीव्यवस्थेची चिकित्सा करणारा तसेच जातीव्यवस्थेचे विच्छेदन करणारा ग्रंथ म्हणून बौद्ध पंडित अश्वघोष यांच्या वज्रसूचि या ग्रंथाचा संत कबीरांनी ब्रिज भाषेत बीजक नावाचा ग्रंथ तयार केला होता त्यातील विप्रमती हे प्रकरण ज्ञानगिरी महाराज आपल्या सुलभ मराठी भाषेत सत्यशोधक कार्यकर्त्यांना समजून सांगत असत.

प्रचलित धर्मातील अनिष्ठ रुढीपरंपरा दूर करुन त्यात सुधारणा व्हावी, माणूस म्हणून सर्वांना सारखे अधिकार मिळावे यासाठी जोतीराव फुल्यांनी प्रयत्न चालविले होते. स्कॉटीश मिशनरी शाळेत असतांना त्यांचा परिचय ख्रिस्तधर्माशी आणि त्यांच्या धर्म प्रसारकाशी आला. त्यांच्या कार्याचा प्रभाव काही काळ जोतीरावांवर दिसून येतो. मात्र विचारवंत थॉमस् पेन यांच्या विचारांनी त्यांना अधिक प्रभावित केले. थॉमस पेनचे Age of Reason, Rights of Man, Justice and Humanity, Comman Sense आणि An Occasional letter on the female sex आणि इत्यादी क्रांतीकारी नवविचारांची पुस्तके त्याकाळात खूप गाजत होती. त्यापैकी काही त्यांच्या वाचण्यात आली. थॉमस् पेनने आपल्या ग्रंथातून धर्मसंस्थेवर वारंवार कोरडे ओढले आहेत. पण त्यांची प्रेरणा धर्माच्या शुध्दीकरणाची होती. धर्मभावना नष्ट करण्याची नव्हती. धर्मभोळेपणा आणि ईश्वरविषयक उथळ, अज्ञानमुलक व असत्य मतप्रणाली यांचा बिमोड करताना खरे ईश्वर ज्ञान, नीती आणि माणुसकीची भावना याचा ऱ्हास होऊ देता कामा नये असा त्यांनी धर्मसुधारकांना ईशारा दिला आहे. धर्म ही एका अर्थी प्रत्येक ईश्वरोपासकाची अत्यंत जिव्हाळ्याची अशी खाजगी वैयक्तिक बाब आहे. जगाचा निर्माणकर्ता परमेश्वर आणि त्याला अनन्यभावे शरण जाणारा मनुष्य यांच्यात मध्यस्थाला अधिकृत स्थान असण्याची मुळीच आवश्यकता नाही. म्हणून मी ज्यु, रोमन, ग्रीक, तुर्की, प्रोटेस्टंट किंवा इतर कोणतेही धर्मशासन (चर्च) मानत नाही हे त्याने जगजाहीर केले. थॉमस् पेनने प्रचलित धर्मग्रंथातील फोलपणा आणि धर्मपंडीतांच्या दांभिकतेवर हल्ले चढविले. Age of Reason मध्ये तो म्हणतो. ईश्वराच्या नावावर साळसुदपणे धर्माचा बाजार मांडला जातो. हे सर्व अनावश्यक व अनिष्टच नव्हे, तर पापमूलक व पाखंडीपणाचे आहे. म्हणून त्याने या मायावी धर्मसंस्थेच्या मुळावरच घाव घालण्याचे धाडस केले. जुना-नवा करार हे धर्मग्रंथ ईश्वरप्रणित असणे कसे शक्य नाही ते त्यांनी निःशंकपणे दाखवून दिले.

प्रोटेस्टंट पंथीयांनी पोपशाहीविरुध्द बंड पुकारले, पण बायबल आणि व्यक्तीची सद्सद्विवेक बुध्दी यांचे प्रामाण्य त्यांनी स्विकारले होते. त्याने बायबलला फाटा दिला आणि सद्सद्विवेक बुध्दीला तर्कबुध्दीची जोड दिली. मात्र ही तर्कबुध्दी विज्ञानप्रवण असली पाहिजे अशी त्यांची अपेक्षा होती. परमेश्वर हा एक आहे तो न्यायी व समदर्शी आहे. म्हणून ईश्वरप्रणित ग्रंथ जर कोणता असेल तर तो एकच असला पाहिजे. इतकेच नव्हे तर तो नित्य प्रगट असला पाहिजे. सर्वकाळातील सर्व देशातील लोकांना तो वाचता आला पाहिजे, त्याचा अर्थ लावता आला पाहिजे. थॉमस्

पेनच्या अशा या क्रांतीकारी नवविचारांचा प्रभाव व त्याकाळी असलेल्या अनेक समाजसुधारकांवर पडला. मानवी प्रतिष्ठा, व्यक्तिस्वातंत्र्य आणि गुलामगिरी विरुध्द बंड हे थॉमस् पेनच्या समग्र विचारप्रणालीचे अतःसुत्र घेऊन जोतीराव फुले यांनी अनेक पातळ्यावर क्रांतीलढे उभारले.

थॉमस पेनच्या या क्रांतीकारी विचारासोबतच फुल्यांवर आणखी कोणाचा अधिक प्रभाव पडला असेल तो म्हणजे बौध्दपंडीत अश्वघोषाच्या वज्रसूचि आणि कबीराच्या बिजक ग्रंथातील विप्रमती या दोन ग्रंथांचा. जातीभेद, विषमता आणि अन्याय्य समाजव्यवस्थेविरुध्द बंड करणारे हे दोन ग्रंथ जोतीराव फुलेच्या जीवनविचारांची आधारशिला बनले. अश्वघोष या बौध्दपंडीताने रचलेल्या वज्रसूची ग्रंथाच्या संस्कृत बृहत्पाठाचा अनुवाद संत तुकोबांच्या शिष्या बहिणाबाई, शाहूकालीन कवी श्यामराज, नाथलीलीमृताचे कर्ते आदिनाथ गुरव तसेच अलिकडे डॉ. रुपा बोधी यांनी केले आहे. वज्रसूचीने जातीव्यवस्थेचे खंडन केले होते. त्यामुळे मध्ययुगीन संतकवी प्रमाणेच म. फुले यांनाही हा ग्रंथ प्रेरक वाटला. वज्रसूचीच्या आधारे जोतीरावाचे सहकारी असलेले तुकाराम तात्या पडवळ यांनी एक हिंदू या टोपणनावाने जातीभेद विवेकसार हा ग्रंथ प्रसिध्द केला. त्याची दुसरी आवृत्ती जोतीरावांनी १८६५ साली स्वखर्चाने प्रकाशित केली होती. संत कबीराच्या बीजक ग्रंथातील विप्रमती हा भाग जोतीरावांना आवडत असे. कबीराचा हा ग्रंथ त्यांनी कबीरपंथी ज्ञानगिरीबाबा यांच्याकडून समजून घेतला असल्याची आठवण तुकाराम हनुमंत पिंजन सांगतात. रा. रा. ज्ञानगिरीबाबा, रामशेठ उरवणे, विठोबा गुठाळ, कुशाबा माळी, ग्यानोबा झगडे मिस्त्री, धोंडीराम, गवंडे वगैरे लोक रात्रीचे ७ ते ९ वाजेपर्यंत जोतीरावांच्या जवळ बसत असत. ज्ञानगिरीबाबा कबीराने केलेल्या बीजक नावाच्या ग्रंथातील बिप्रमती भाग त्यास वाचून दाखवीत असत. बिप्रमती भाग ब्रिजभाषेत लिहीला असल्यामुळे ज्ञानगिरीबाबा (नानाच्या पेठेतील कबीरपंथी मठात राहत असलेले गृहस्थ) पुराणिक जमलेल्या श्रोत्यांना त्याचा अर्थ मराठीत करुन सांगत असत. त्याभागात ब्राह्मणांच्या स्वार्थ स्वभावाचे व वर्तणुकीचे फारच बहारीचे वर्णन त्यात केले आहे.

म. फुले यांच्या तालमीत तयार झालेले त्यांचे सत्यशोधक सहकारी ज्ञानगिरी बाबा केवळ प्रवचनकारच नव्हते तर ते शेतकऱ्याच्या हितासाठी लढणारे बंडखोर नेते होते. महाराष्ट्रातील सावकारशाही विरुद्ध जे पहिले बंड झाले ते गंगापूरला ज्ञानगिरी बाबांनी घडवून आणले जमिनी गोदाकाठच्या असल्या तरी शेतकरी दरिद्री होता. सावकार शेतकऱ्यांच्या जमिनी गहाण खते लिहून घेत असे व फार अल्प पैसे देत असे. या जमिनीची मालकी सावकाराकडे असे. वहीवटीसाठी त्या जमिनी त्या त्या शेतकऱ्याकडे ठेवल्या जात असत शेतकऱ्यांची या अन्यायापासून मुक्तता करण्यासाठी ज्ञानगिरी बाबांनी एक युक्ती शोधून काढली त्यांचे हस्ताक्षर उत्तम होते इतरांच्या हस्ताक्षरांची सह्यांची ते हुबेहूब नकल करीत. गंगापूर, वैजापूर व नगर जिल्ह्यातील गंगाखेडच्या भागातील शेतकऱ्यांना बोलावून सावकाराचे कर्ज परत दिल्याच्या सावकाराच्या बनावट सह्या असलेले कागद त्यांनी दिले व शेतकऱ्यांना ताबा घेण्यास सांगितले या सह्यांचे दावे औरंगाबादच्या जिल्हा कोर्टात चालले व बहुतांश प्रकरणाचा शेतकऱ्याच्या बाजूने निकाल लागला आणि शेतकरी कर्जमुक्त झाले.

सत्यशोधक समाजाच्या सातव्या व आठव्या अधिवेशनाच्या संयुक्त अहवालानुसार सातवी परिषद खानदेशात आडगाव येथे ज्ञानगिरी बुवा गोसावी यांच्या अध्यक्षतेखाली भरली होती अशा परिषदाचे फायदे सांगतांना त्यांनी म्हटले की परिषदामुळे आपल्या समाजास नवीन जीवन मिळवून चळवळ जास्त जोराने सुरू झाली आहे व समाजाचा प्रसार होत आहे.

या कबीर मठाच्या सहवासात अजून एका व्यक्तीची वैचारिक जडणघडण झाली ती म्हणजे गोपाळ बाबा वलंगकर यांची! तत्कालीन अस्पृश्य समाजातील पहिले पत्रकार, पहिले विद्रोही साहित्यिक तसेच महाड लोकल बोर्डाचे पहिले सरकार नियुक्त सदस्यचा इत्यादी बहुमान त्यांना जातो. महाड जवळील रावढळ या गावाचे रहिवाशी असलेले वलंगकर ब्रिटिश सैन्यात हवालदार होते. त्यांच्या पलटणीचा मुक्काम अनेकदा बराच काळ पुण्यात असे. त्यावेळी ते फुले यांच्या भेटीस येत असत. त्यांना फुल्यांबद्दल अतिशय आदर होता.

त्यांच्या संपर्कात आल्यापासून गोपाळबाबांच्या चौकस बुध्दीमत्तेचे वारु चौफेर उधळू लागले. गोपाळबाबा फुलेंच्या सत्यशोधक तालमीत तयार झाले. जोतीराव फुले देखील आपल्या सहकाऱ्यांसह गोपाळबाबा यांच्या घरी अधूनमधून जात असत. यासंदर्भात तात्यासाहेब धोंडीबा रोडे आठवण सांगतात की, एकदा भवानी पेठेतील महारवाडयातून जोतीराव फुले, नवले, धोंडीराम, मी व इतर १/२ गृहस्थ जोतीरावाचे शिष्य श्री गोपाळबाबा वलंगकर (अस्पृश्य) यांच्याकडे चालला होतो.''

जोतीराव फुले यांचे सहकारी, त्यांचे हिशोब जमाखर्च लिहिणारे गोविंद गणपत काळे हे आठवणी सांगतात की, महात्मा फुले यांच्या घरी बाहेरुन आलेली कोणी ना कोणी मंडळी रोज त्यांच्या पंगतीत असत. त्यांचे एक महार जातीचे अनुयायी के. गोपाळबुवा वलंगकर हे त्यांच्याकडे असले म्हणजे भोजनास आलेल्या सर्व मंडळीना सहभोजनाचा लाभ होत असे. विटाळ अथवा शिवाशिव त्यांचे घरी चुलीपर्यंत मुळीच नसे. विटाळ पाळणाऱ्या माणसांचा त्यांचा मोठा तिटकारा वाटत असे. त्यामुळे बाहेरुन आलेल्या काही अंगतुक सोवळ्या मंडळीस निमुटपणे वलंगकरांच्या पंगतीस बसावे लागे.

अस्पृश्यांच्या बाबतीत महात्मा फुले यांच्या घरचे वातावरण कसे होते याबाबत अस्पृश्य समाजातील सुभेदार मेजर म्हणून सेवानिवृत्त झालेले एक पुढारी राघोराम सज्जन घाटगे (आर.एस. घाटगे) आपल्या आठवणीत सांगतात की, कै. गोपाळबुवा वलंगकर यांच्याबरोबर मी प्रथम तात्यांच्या येथे गेलो होतो. त्यानंतरही बऱ्याचवेळा गेलो. परंतु त्यांच्या घरी शिवाशिव अथवा विटाळ मुळीच पाळला जात नसे. ते बोलके सुधारक नव्हते. अस्पृश्यांशी ते रोटीबेटी व्यवहार करीत असत. असो. आमच्या अस्पृश्यांच्या सुधारणेविषयी तर त्यांना फारच कळवळा असे. ही घटना १८८७ सालची असून त्यावेळी श्रीयुत घाटगे यांचे वय १५ वर्षाचे होते.

गोपाळबाबाच्या वैचारीक जडणघडणीत म. फुलेंचे योगदान फार मोठे होते. यासंदर्भात धनंजय कीर लिहितात की, अस्पृश्यांचे प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीने जोतीरावांनी आणखी एक मोठी कामगिरी केली. त्यांनी प्रत्यक्ष अस्पृश्य समाजातच कार्यकर्ते निर्माण केले. अस्पृश्य वस्त्यांना ते नेहमी भेटी देत असत आणि त्यांच्यातील उत्साही आणि बुध्दीमान तरुणांनी अस्पृश्यांच्या कल्याणासाठी झटावे म्हणून त्यांना उत्तेजन देत असत. त्यांना लिहायला आणि भाषणे करायला शिकवित असत. समाजकार्य कसे करावे हयाचे मार्गदर्शन करीत असत. अश्या कार्यकर्त्यांपैकी गोपाळबाबा वलंगकर हे आद्य व प्रमुख होत. ते जोतीरावांचे विद्यार्थी.

जोतीरावांच्या शिकवणीमुळे आणि मार्गदर्शनामुळे ते लेखक झाले, पट्टीचे प्रचारक झाले, उत्तम वक्ते झाले. २२ नारो आबाजी महाघट हे देखील महात्मा फुले यांचे अमरजीवन या लेखात धनंजय कीर यांच्या विधानाला पृष्टी देतात की, जोतीराव फुले १८८७साली अस्पृश्य समाजातील कार्यकर्ते निर्माण करण्यासाठी त्यांना सभेत कसे बोलावे हे शिकवित होते व हे शिक्षण पक्के होण्यासाठी त्यांच्या छोटया-मोठ्या सभा घेऊन त्यात त्यांना बोलायला लावीत, अशी आठवण सांगतात.

फुल्यांच्या बैठकीत होणाऱ्या ज्ञानगिरीबाबांच्या या प्रवचनास गोपाळबाबा वलंगकर नित्य हजर राहण्याची शक्यता नाकारता येत नाही. कारण त्यांच्यावरही फुले यांच्या प्रमाणेच कबीराच्या तत्वज्ञानाचा प्रभाव कसा पडलेला हे त्यांनी १८८८साली लिहिलेल्या विनंतीपत्र नावाच्या छोटया पुस्तिकेत विचारलेल्या २६ तर्कनिष्ठ, बुध्दीप्रामाण्यवादी प्रश्नावरुन स्पष्ट होते. विठ्ठलरामजी शिंदे यांनी मात्र या मताचे खंडन करुन माझ्या आठवणी व अनुभव या आत्मचरित्रात (पृ. २१४) ते म्हणतात की, वलंगकर यांच्यावर ख्रिस्तधर्म स्विकारलेले बाबा पद्मनजी यांच्या विचाराचा प्रभाव होता. तर गोपाळबाबा हे कबिरपंथी साधू असून त्याच्यावर कबीराप्रमाणे महात्मा फुले यांच्या विचारांचा प्रभाव असल्याचे रमेश धवरे यांनी सप्रमाण सिध्द केले आहेत.

त्याकाळी सुभेदार मेजर रामजी आंबेडकरांसह महार जातीतील अनेक प्रतिष्ठीत गृहस्थ कबिरपंथी होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बुध्द, फुले, यांच्यासह कबीराला आपले गुरु मानले हे लक्षात घेण्यासारखे आहे. त्यामुळे वलंगकरांच्या वैचारीक जडणघडीत या महापुरुषांचा मोठा वाटा आहे हे लक्षात येते म्हणूनच ते विद्रोहाचे वारसदार ठरतात. महाराष्ट्रामध्ये सत्यशोधक चळवळीचा प्रसार मोठ्या प्रमाणात होऊन बहुजन समाजात त्यामुळे बरीच जागृती झाली.सत्यशोधक चळवळीची वैचारिक बांधणी कारण्यात नाना पेठेतील कबीर मठाचे भूमिका आपणास दुर्लक्षित करता येणारे नाही.

**डॉ. प्रेम हनवते, पुणे.**
**8888857402**
**फुलेआंबेडकरी चळवळीचेअभ्यासक**

*(२४ सप्टेंबर १८७३ सत्यशोधक समाज स्थापना दिनानिमित्याने )*